**जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील ४ ठिकाणांचे प्रस्तावित रेतीघाटांचे पर्यावरण विषयक जाहीर जन सुनावणीचे इतिवृत्त..**

---

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांची पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनीयम दि.१४.०९.२००६ मध्ये नमुद केलेल्या तरतुदीनुसार, जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील ४ ठिकाणांचे प्रस्तावित रेतीघाटांचा अर्ज शिवणा नदी पात्रातील रेती घाट जसे राजुरा उंदीरवाडी आणि लाखणी, गोदावरी नदी पात्रातील रेती घाट जसे अव्वलगाव नागमठाण आणि वांजरगाव जनसुणावणीसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झालेला आहे. त्याअनुषंगाने मा. जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांच्या परवानगीने आजची लोकसूनावणी दि. १६/१०/२०२५ रोजी दुपारी०३:३० निश्चित करण्यात आली. तसेच सदरच्या लोकसुनावणीसाठीचे आदेश मा. सदस्य सचिव, मप्रनि मंडळ यांचे दि. १५/१०/२०२५ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आले.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे कार्यालयीन आदेश क्रं.ई-७१ ऑफ २०२५ दि. १५/१०/२०२५ अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे सदस्य सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

१. श्री. अरुण जऱ्हाड : अध्यक्ष
उपविभागीय अधिकारी
उपविभागीय कार्यालय वैजापूर

२. श्री. मनिष होळकर : सदस्य
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, छ. संभाजीनगर.

३. श्री.अच्युतनांदवटे : समन्वयक
उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ,
छत्रपती संभाजी नगर

श्री. अच्युत शे. नांदवटे समन्वयक पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजी नगर यांनी उपस्थितांचे स्वागत करुन पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर जाहीर लोकसुनावणीची कार्यवाही सुरु केली. त्यांनी सांगितले की, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांची पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनीयम दि.१४.०९.२००६ मध्ये नमुद केलेल्या तरतुदीनुसार, जिल्हा खनिकर्म

होळकर

अधिकारी, खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील ४ ठिकाणांचे प्रस्तावित रेतीघाटांचा अर्ज जसे गोदावरी नदी पात्रातील रेती घाट जसे पाटेगाव, विरभद्रा नदी पात्रातील रेती घाट जसे नांदर भाग २, नांदर भाग ३ आणि ब्रह्मगाव जनसुणावणीसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झालेला आहे. त्याअनुषंगाने मा. जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांच्या परवानगीने आजची लोकसूनावणी दि. १६/१०/२०२५ रोजी दुपारी ०३:३० निश्चित करण्यात आली. तसेच सदरच्या लोकसुनावणीसाठीचे आदेश मा. सदस्य सचिव, मप्रनि मंडळ यांचे दि. १५/१०/२०२५ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेले आहे.

सदर प्रकल्प हा पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकारचे अधिनियम दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेनुसार पर्यावरण विषयक मंजुरी घ्यावी लागते, त्याचाच एक भाग म्हणून सदर प्रकल्पासाठी जाहीर लोक सूनावणी घेणे आवश्यक आहे. पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी बाबत नियमानूसार जाहीर सूचना ३० दिवस अगोदर दि. १६/०९/२०२५ रोजी दैनिक सकाळ व दैनिक टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली. सदर प्रकल्पाची माहिती पुस्तिका, कार्यकारी सारांशाची प्रत, पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाच्या प्रती इत्यादी दस्तावेज (इंग्रजी व मराठी मध्ये) जिल्हयातील संबंधित शासकीय कार्यालयांमध्ये नागरिकांच्या अभ्यास व अवलोकनाकरीता ठेवण्यात आलेल्या होत्या व याबाबत काही सूचना / आक्षेप असल्यास याबाबत कळवण्यासाठी ३० दिवसाची मुदत देण्यात आलेली होती. , त्याची यादी खालीलप्रमाणे-

१. जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.

२. जिल्हा परिषद कार्यालय, अंबा अप्सरा समोर, छत्रपती संभाजीनगर.

३. जिल्हा उद्योग केंद्र, छत्रपती संभाजीनगर.

४. तहसिल कार्यालय, वैजापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

५. पंचायत समिती कार्यालय, वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर.

६. ग्रामपंचायत कार्यालय, राजुरा उंदीरवाडी/लाखणी/अव्वलगाव नागमठाण आणि वांजरगाव, ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर.

७. प्रादेशिक कार्यालय/उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, प्लॉट नं. ४/१ पर्यावरण भवन लोकपत्रच्या मागे, चिकलठाणा, औद्योगिक क्षेत्र, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर.

८. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, ३ रा माळा, सायन माटूंगा स्कीम रोड नं.८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-२२.

९. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.

१०. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पूर्व विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर.

जन सुनावणी बाबत वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहीर सूचनेमध्ये प्रकल्पासंबंधीत बाधित अथवा इतर व्यक्तींनी प्रकल्पाचा पर्यावरण आघात मूल्यांकन अहवाल, कार्यकारी सारांशाच्या प्रति अभ्यासासाठी ठेवण्यात आलेल्या आहेत. सदर प्रकल्पाबाबत आपले मत, विचार, सूचना , हरकती लेखी स्वरूपात सुनावणीच्या दिवसापर्यंत उप छत्रपती संभाजीनगर यांना कळविण्यात याव्यात अथवा सुनावणीच्या दिवशी देण्यात याव्यात . सुनावणी दरम्यान आपले लेखी मत, विचार, सूचना , हरकती सादर केल्या जाऊ शकतात अथवा त्यांचे सादरीकरण केले जाऊ शकते याबाबत आवाहन करण्यात आले. त्यांनी नमुद केले की, याबाबत काही सूचना/आक्षेप असल्यास याबाबत कळवण्यासाठी ३० दिवसाची मूदत देण्यात आलेली होती त्या अनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, छत्रपती संभाजीनगर येथे लोकांकडून पैठण तालुक्यातील ४ ठिकाणांचे प्रस्तावित रेतीघाटांबाबत सुनावणीच्या दिवसापर्यंत कुठल्याही आक्षेप हरकती अथवा सूचना प्राप्त झालेल्या नाहीत.

त्यांनी सांगितले की पर्यावरण विषयक जन सुनावणी ही सर्वसामान्य लोकांसाठी त्यांचे मत व्यक्त करण्याचे ठिकाण असून पर्यावरण विषयक अनुज्ञप्ती संमत करण्याबाबत निर्णय पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय येथे घेतला जाईल. त्यामुळे त्यांनी उपस्थित जनसमुदायास सदर प्रकल्प बाबतचे त्यांचे मत आक्षेप हरकती सूचना व्यक्त करण्याबाबतचे आवाहन केले. आपण व्यक्त केलेले मत सूचना आक्षेप यांचे व्हिडिओ शूटिंग करून त्याबाबतचे इतिवृत्त पर्यावरण विभाग मंत्रालय यांना सादर केले जाईल असे त्यांनी सांगितले.

जनसुनावणी समितीच्या अध्यक्ष तथा उपविभागीय अधिकारी अरुण जऱ्हाड यांनी पर्यावरण विषयक जन सुनावणी सुरू करण्याचे व प्रकल्प प्रवर्तकास त्यांच्या प्रकल्पाचे पर्यावरण विषयक ठळक बाबी पर्यावरण विषयक केलेल्या उपायोजना इत्यादी बाबत सादरीकरण करतील असे सांगितले. त्यानंतर प्रकल्प प्रवर्तकाचे पर्यावरण सल्लागार इन्वायरो टेक्नो कन्सल्टंट प्रायव्हेट लिमिटेड, नागपूर यांनी प्रकल्पाचे सादरीकरण केले. त्यांच्या सादरीकरणात त्यांनी प्रकल्पाची सद्यस्थिती , उत्खनन करावयाचे खनिज , रेतीघाट प्रस्तावित करणारी समिती व उत्खनन करण्यासाठी ठरवून दिलेला कालावधी इत्यादी बाबतची माहिती दिली. रेती उत्खननाची पद्धत, वायु प्रदूषण नियंत्रण यंत्रणा, ध्वनी प्रदूषण नियंत्रण यंत्रणा, वाहतूक व्यवस्थापन, वृक्षारोपण योजना इत्यादी बाबतची इत्यंभूत माहिती देण्यात आली. सुनावणी दरम्यान त्यांनी प्रस्तावित रेती घाटाचे कार्यक्षेत्र, अंदाजीत उत्खनन होणारी रेती, उत्खननासाठी वापरली जाणारी यंत्रणा व पर्यावरण पूरक उपाय योजनांची माहिती दिली. रेती उत्खननाबाबत जिल्हा खनीकर्म अधिकारी जिल्हा पर्यावरण विषयक समितीस नियमितपणे अहवाल सादर करतील. जिल्हा पर्यावरण समिती माननीय जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेली असून सदर समितीत उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग , पोलीस आणि आरटीओ विभागाचा प्रतिनिधी यांचा समावेश असून जिल्हा खनिकर्म अधिकारी सदर समितीचे सदस्य सचिव आहेत. गौण खनिज उत्खनन प्रकल्पाबाबत पर्यावरण विभाग मंत्रालय यांचे परिपत्रक दिनांक ३ डिसेंबर २०१९ व परिपत्रक दिनांक ०४ मे २०२० अनुसार पर्यावरण विषयक सुनावणी घेण्यात येत आहे असे सांगितले. त्यानंतर त्यांनी त्यांचे सादरीकरण संपले असे जाहीर करून उपस्थित जनसमुदायास त्यांचे प्रश्न. शंका अथवा सूचना देऊ शकतात असे सांगितले.

लोळकर

अध्यक्ष जन सुनावणी समिती यांनी उपस्थित जनसमुदायास पैठण तालुक्यातील रेती उत्खनन प्रस्तावित प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना , विचार, हरकती नोंदविण्यासाठी सर्वप्रथम आपले नाव सांगावे आणि त्यानंतर आपले प्रश्न मांडावेत असे सांगितले.

१. सर्वप्रथम उपप्रादेशिक अधिकारी तथा समन्वयक जन सुनावणी समिती यांनी त्यांच्याकडे ग्रामपंचायत कार्यालय लाखनी जांभरखेडा यांच्याकडून दिनांक ९ ऑक्टोबर २०२५ रोजी निवेदन प्राप्त झाले असून त्यांचे सुनावणी दरम्यान वाचन करण्यात आले. सदर निवेदनात ग्रामस्थांनी मौजे लाखनी जांभरखेडा परिसरात रेती उपसा झाल्यामुळे भूगर्भातील पाण्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो व सभोवतालच्या परिसरातील फळबाग जसे मोसंबी यांच्यावर विपरीत परिणाम होऊन शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ येऊ शकते असे नमूद केले होते.

२. **लाखनी गावचे ग्रामस्थ यांनी** केटी विहीर सभोवताली रेती उत्खनन करता येऊ शकते का असा प्रश्न उपस्थित केला

त्यावर जिल्हा खनिक्रमाधिकारी यांनी केटी विहीर सभोवतालचे १०० मीटर क्षेत्र प्रतिबंधित क्षेत्र असून त्या परिसरात रेती उत्खनन करता येणार नाही असे सांगितले.

त्यावर त्यांनी " लाखनी गावातील १३५ ते १०७ हे सर्व नंबर केटी विहीर पासून १०० मीटर क्षेत्रात असून समितीने दिलेला सर्वेचा रिपोर्ट चुकीचा असल्याबाबत मत व्यक्त केले"

जिल्हा खणी कर्म अधिकारी यांनी " सदर समिती शासन नियुक्त असून शासनाच्या ध्येय धोरणानुसार व नियमावलीनुसार अहवाल सादर करते" असे सांगितले.

अध्यक्ष जन सुनावणी समिती यांनी " सदर समिती तहसीलदार याच्या अध्यक्षतेखाली नियुक्त असून समितीमध्ये नेमलेले तांत्रिक सदस्य शासनाच्या निकषानुसार / नियमावलीनुसार अहवाल सादर करते" असे सांगितले. सदर समितीमध्ये भूगर्भातील पाण्याचे अभ्यासक (GSDA), खनिकर्म विभागातील शास्त्रज्ञ व तज्ञ लोकांची समिती असते. त्यामुळे त्यांच्या कार्यक्षमतेबद्दल मत व्यक्त न करता पर्यावरण विषयक आपण आपले मत व्यक्त करावे" असे अध्यक्ष जन सुनावणी समिती यांनी सांगितले.

लाखनी गावाचे ग्रामस्थ यांनी " केटी विहीर सभोवतालच्या रेती उत्खननावर आक्षेप नोंदवून मागच्या वर्षी पण याच भागात रेती उत्खनन केलेले असून मागच्या वर्षी या परिसरात केटी विहीर नव्हती. परंतु सध्या केटी विहीर सभोवताली उत्खनन केल्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो."

उपप्रादेशिक अधिकारी तथा समन्वयक जन सुनावणी समिती यांनी " आपण व्यक्त केलेले मत समितीने नोंदविले असून त्याचे व्हिडिओ रेकॉर्डिंग केलेले आहे. सदर बाब इतिवृत्तात नमूद करून शासनास कळविण्यात येईल " असे सांगितले. त्यानंतर लाखनी गावाचे ग्रामस्थ यांनी रेती उत्खरणाच्या प्रक्रिया बाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करून सादरीकरणात दाखविल्याप्रमाणे घमेले फावडे न वापरता यांत्रिक पद्धतीने रेती उत्खनन केले जात असल्याचे सांगितले.

अध्यक्ष जन सुनावणी समिती तथा उपविभागीय अधिकारी यांनी " सद्यस्थितीत आपण प्रस्तावित रेती घाटाच्या पर्यावरण विषयक जन सुनावणीसाठी एकत्र आलेलो आहोत त्यामुळे आपण पर्यावरण विषयक आपल्या सूचना कराव्यात. रेती घाट मंजुरी प्राप्त झाल्यानंतर त्याच्या निवेद्य दरम्यान कंत्राटदारास आपण सांगितलेल्या बाबी बाबत सूचना दिल्या जातील."

३. त्यानंतर अध्यक्ष जन सुनावणी समिती तथा उपविभागीय अधिकारी यांनी वांजरगाव ग्रामपंचायतकडून रेती उत्खनन विरोध करणारा ग्रामस्थांचा अर्ज त्याबाबतचा ठराव प्राप्त झाल्याचे सांगितले. सदरबाबत वांजरगाव ग्रामस्थ उपस्थित असल्यास ते त्यांचे म्हणणे सादर करू शकता असे त्यांनी सांगितले. वांजरगाव उपसरपंच श्री जावेद यांनी त्याबाबत आपली भूमिका मांडताना सांगितले की " सर्वे नंबर ८५.८६.८७ या ठिकाणी सन २०२३ साली उत्खनन झालेले असून सद्यस्थितीत तेथे रेती साठा शिल्लक नाही. सर्वे नंबर ८८ मध्ये पाणीपुरवठा विहीर आहे असे त्यांनी सांगितले. रेती उत्खनन झाल्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी खाली जाऊन वांजरगावला पिण्याच्या पाण्याचे दुरभिक्ष झाले असल्याचे त्यांनी सांगितले. वांजरगाव येथे महाराजांचे पवित्र बेट असून लाखो भाविक दरवर्षी तेथे येत असतात. रेती उत्खनन केल्यामुळे पिण्याच्या पाण्याच्या प्रश्न निर्माण झाला असून ग्रामपंचायत वांजरगावकडून सदर रेती उत्खननास विरोध आहे असे त्यांनी सांगितले

४. श्री चौधरी सरपंच लाखनी यांनी सांगितले की रेती उपसा केल्यामुळे पाण्याची पातळी खोल गेलेली असून पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. सन 2024 साली आमच्या गावाला पाण्याचा पुरवठा टँकरद्वारे केलेला आहे. रेती उत्खनन केंद्राजवळ शाळा आणि पाणीपुरवठा विहीर असल्यामुळे पाणीपुरवठ्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. ग्रामपंचायत लाखनी कडून आम्ही अर्ज दिलेला आहे परंतु त्यामध्ये उपरोक्त मुद्दे समाविष्ट असल्यामुळे मी नमूद करत आहे.

५. ग्रुप ग्रामपंचायत राहेगाव येथील सरपंच यांचे पती यांनी सांगितले की आमची पाच गावांची ग्रुप ग्रामपंचायत असून नावे जमिनीतील पाण्याची पातळी कमी होत असून आमच्या भागातील पाणीटंचाई रेती उपसा कारणीभूत आहे असे माझे मत आहे. रेती उत्खननाबाबत असलेले दुष्परिणाम सर्वांनी सांगितले आहेत परंतु मी नमूद करू इच्छितो की आणि आमची सर्व गावे पाणी टंचाईग्रस्त आहेत . सादरीकरणात दाखवलेले पर्यावरण पूरक उपकरणे जसे पावडे कुदळ रेती उत्खननास वापरले जात नसून रेती उपसा करण्यासाठी जेसीबी हायवा यांचा वापर केला जातो . रेती उत्खनन केल्यानंतर वापरल्या जाणाऱ्या वाहनामुळे आमच्या परिसरातील रस्त्यांची दुरावस्था झालेली आहे मी माझे लेखी निवेदन माझ्यासोबत आणलेले असून ते आपणास सादर करत आहे . त्यांनी त्यांच्या लेखी निवेदनाची समन्वयक जन सुनावणी समिती यांना सादर केली.

६. श्री बाळासाहेब गडक, माजी सरपंच यांनी सांगितले की पाण्याची पातळी खोल जात असून सभोवतालचा शेती व्यवसाय जसे मोसंबीची बाग याच्यावर विपरीत परिणाम होत आहे. लोकांना पिण्याच्या पाण्याच्या अडचणी येत असून सर्व शेतकऱ्यांच्या वतीने मी आपणास निवेदन करतो की आमच्या भागामध्ये रेती उत्खननास परवानगी देण्यात येऊ नये.

७. ग्रामस्थ श्री गणेश तांबे यांनी सांगितले की " आम्ही सर्व ग्रामस्थ पूर्वीपासून रेती उत्पन्नास विरोध करीत आहोत. सदर बाबत आम्ही माननीय उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केलेली असून सदर



होळकर

प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे" . समन्वयक जन सुनावणी समिती यांनी " माननीय उच्च न्यायालयात दाखल केलेले दस्तावेज आपण जन सुनावणी समितीला सादर करू शकता " असे सांगितले. श्री गणेश तांबे यांनी सांगितले की " वाळू उत्खनन केल्यानंतर नवीन वाळू निर्माण होण्यास बराच कालावधी लागतो. वाळू उत्पन यांत्रिक पद्धतीने केले जात असून भरती केलेल्या वाहनाची क्षमता पेक्षा जास्त असते. त्यामुळे सभोवतालचे रोड व वाहतूक विस्कळीत होत असल्याचे त्यांनी सांगितले. जमिनीतील व नदीपात्रातील वाळू ऐवजी कृत्रिम वाळू वापरली तर चालू शकते असे असताना नदीपात्रातील वाळू उत्खननबाबत शासन आग्रही का आहे असे त्यांनी प्रश्न उपस्थित केले. वाळू उपसा केल्यामुळे पिण्याच्या पाण्याच्या अडचणी निर्माण होत असून सदर बाबत आम्ही माननीय उच्च न्यायालय जमिनीत याशिवाय दाखल केलेली आहे" असे त्यांनी सांगितले. समन्वयक पर्यावरण समिती यांनी सांगितले की आपले म्हणणे व्हिडिओ रेकॉर्डिंग करून व इतिवृत्तात नमूद करून शासनास कळविण्यात येईल.

८. श्री जालिंदर रतन बेलेकर ग्रामस्थ यांनी सांगितले की " वाळू उत्खननामुळे जमिनीतील पाण्याची पातळी कमी होऊन येण्याच्या पाण्याच्या अडचणी या भागामध्ये निर्माण होत आहेत. तरी नदीपात्रातील वाळू उत्खनन करण्याऐवजी कृत्रिम वाळू किंवा इतर पर्यायाचा शासनाने विचार करावा " अशी मी आपणास विनंती करतो असे सांगून त्यांनी त्यांचे दोन शब्द थांबवले.

९. लासूर गावचे सरपंचपती श्री घुमे यांनी सांगितले की "लासुर गावचे गट नंबर 216, 217, 219 पाणीपुरवठा विहिरी पासून खूप जवळ असल्याकारणाने त्या ठिकाणी रेती उत्खननास परवानगी देण्यात येऊ नये. लासुर शहादपूर या गावी नदीपात्राजवळ पाणीपुरवठा विहिरी असून त्या ठिकाणाहून रेती उत्खनन करणे योग्य होणार नाही. त्यामुळे तांत्रिक समितीने रेती उत्खननाबाबत दिलेला अहवाल चुकीचा असावा" असे त्यांनी मत व्यक्त केले. " सदर बाबत आम्ही तक्रार सोबत आणलेली असून आम्ही आपणास सादर करतो असे त्यांनी सांगितले. सदर भागांमध्ये रेती उत्खनन करून शेतकऱ्यांचा पाण्याचा प्रश्न बिकट करू नका" असे त्यांनी सांगितले.

१०. श्री सचिन कदम इंदलवाडी यांनी सांगितले की " गट नंबर 23 मध्ये माझी जमीन असून माझी शेतीसाठी पाण्याची विहीर त्या भागात आहे. माझ्या शेतजमिनीमध्ये मोसंबी हे बागायती पीक घेतले जात असून वाळू माफियांकडून मला नियमितपणे धमकावले जाते. त्यामुळे त्यांनी विनंती केली की सदर भागांमध्ये रेती उत्खनन करून शेतकऱ्यांचा पाण्याचा प्रश्न बिकट करू नका " असे त्यांनी सांगितले.

११. सुनावणी दरम्यान एक शेतकरी यांनी आपले पर्यावरण विषयक जन सुनावणी व रेती उत्खनन बाबत मत व्यक्त केले. त्यांनी सांगितले की गोदावरी नदीकाठी त्यांचे शंभर एकर जमीन असून रेती उत्खननामुळे जमिनीतील पाण्याचे पातळी खालावत असून त्याचा शेती पिकावर वाईट परिणाम होऊ शकतो. त्यामुळे शासनाने व नदीतील रेती उपसा करण्याऐवजी कृत्रिम रेती वापरण्यावर भर दिला पाहिजे. पावना आणि शिवना नदी तीरावर प्रदूषण नियंत्रण मंडळाने पर्यावरण संवर्धन करण्याच्या दृष्टीने वैजापूर तालुक्यातील गावरान जमिनीमध्ये वृक्ष लागवड करणे गरजेचे आहे. त्यांनी सांगितले की मी सद्गुरु गंगागिरी महाराजांच्या सरला बेटचा शिष्य असून त्याच्या सभोवताली वृक्ष लागवड करून भेट संरक्षित करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. बेटा सभोवताली वृक्ष लागवड करून

रेती साठा संरक्षित केल्यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी वाढून सभोवतालच्या परिसरातील लोकांच्या पिण्याचा प्रश्न सुटू शकेल असे त्यांनी सांगितले.

त्यानंतर अध्यक्ष जन सुनावणी समिती यांनी " जन सुनावणीची प्रक्रिया पारदर्शकपणे राबवली जात असून आपण व्यक्त केलेले मत, विचार यांचा समावेश करून त्याचे व्हिडिओग्राफ पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय यांना पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येईल." त्यादरम्यान उपस्थित जनसमुदायापैकी काही लोकांनी आम्हाला इतिवृत्त आणि व्हिडिओ शूटिंगची सीडी उपलब्ध होईल का असा प्रश्न उपस्थित केला. समन्वयक जन सुनावणी समिती तथा उपप्रादेशिक अधिकारी श्री नांदवटे यांनी सांगितले की जनसुनावणी समितीने तयार केलेले इतिवृत्त आणि व्हिडिओ सीडी आपणास माहिती अधिकार कायदा 2005 अंतर्गत आपण अर्ज केल्यास उपलब्ध करून देता येऊ शकेल.

जन सुनावणी समन्वयक तथा उपप्रादेशिक अधिकारी छत्रपती संभाजीनगर यांनी सदर जनसुनावणी संपेपर्यंत एकूण सात निवेदने प्राप्त झालेली असल्याबाबत माननीय अध्यक्ष जनसुनवाणी समिती व सदस्य जन सुनावणी समिती यांच्या निदर्शनास आणून दिले. माननीय अध्यक्ष जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांचे प्रश्न संपले असतील असे गृहीत धरून जनसुनावणी संपन्न झाली असे मी जाहीर करतो असे सांगितले. जन सुनावणी समन्वयक तथा उपप्रादेशिक अधिकारी छत्रपती संभाजीनगर यांनी उपस्थितांचे आभार मानून संपन्न झालेल्या जन सुनावणीचे इतिवृत्त व व्हिडिओ रेकॉर्डिंग पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय यांना पाठविण्याची कार्यवाही करण्यात येईल असे सांगून जन सुनावणी संपली असे जाहीर केले.

(अच्युत नांदवटे)
**समन्वयक तथा उप प्रादेशिक अधिकारी,**
**म.प्र.नि. मंडळ, छत्रपती संभाजी नगर**

होळकर
**(श्री. मनिष होळकर )**
**सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी**
**म.प्र.नि. मंडळ, छत्रपती संभाजी नगर**

**(श्री.अरुण जऱ्हाड)**
**अध्यक्ष तथा उपविभागीय अधिकारी**
**उपविभागीय कार्यालय वैजापूर**

**************************************